क्रमांक : ७०२४ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २९ मार्च, २०२३

**विषय :- या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीची नोंद बायोमेट्रीक प्रणालीवर करण्याबाबत**

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ५१२४/क-१, दि. ०८ मार्च, २०२३**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (वर्ग १ ते वर्ग ४) यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कार्यालयात येण्याची व जाण्याची या वेळेची उपस्थितीची नोंद करण्याकरीता सोमवार, दिनांक १३ मार्च ते शुक्रवार, दि. ३१ मार्च, २०२३ या कालावधीत प्रायोगिक तत्वावर बायोमेट्रीक यंत्रणा सुरु करण्यात आली आहे. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना बायोमेट्रीक यंत्रणेवर उपस्थितीची नोंद घेताना काही अडचणी उद्भवल्यास त्यांनी दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजीपर्यंत संगणक कक्षाशी संपर्क साधून उपस्थिती संदर्भातील अडचणींचे निराकरण करुन घेण्यात यावे.

दिनांक ०३ एप्रिल, २०२३ रोजीपासून या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी, मा.समितीप्रमुख यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले स्वीय सहायक, शिपाई तसेच तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले सर्व कर्मचारी यांना कार्यालयात येताना व कार्यालयातून जाताना उपस्थितीची नोंद बायोमेट्रिक यंत्रणेवर नोंदविणे अनिवार्य राहील. दिनांक ०३ एप्रिल, २०२३ पासून हजेरीपट बंद करण्यात येईल.

आदेशानुसार

**(सायली कांबळी)**
उप सचिव (विधी)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

..२/-

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) क-२ संगणक कक्ष

११) निवडनस्ती.